माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक २२६२/२०१८, २२६३/२०१८, २३७२/२०१८, २३८१/२०१८, व २३९०/२०१८

लक्ष्मण वामनराव ठाकरे
रा. जयंत कॉलनी, छत्री तलाव रोड
अमरावती,जि,अमरावती

**अर्जदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय सहसंचालक,उच्च शिक्षण विभाग
अमरावती विभाग, जि. अमरावती

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक,उच्च शिक्षण विभाग
अमरावती विभाग, जि. अमरावती

| **उपस्थिती**: सुनावणी दिनांक **१३.०५.२०२२** | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| ज.मा.अ. | व्यक्तीशः | हनुमंत के.आसलकर |
| प्र.अ.अ. | व्यक्तीशः | डॉ.मुरलीधर प्रभाकर वाडेकर |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

अर्जदार गैरहजर

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः १३ मे २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगानी चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

२.अपिल क्र.२२६२/२०१८ मध्ये

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | ०५.०३.२०१८ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | - |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | ०७.७.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | - |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | २४.०८.२०१८/२७.०८.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशापासून दिवसः | ५१ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | २९.०४.२०२२ |

अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

माहितीचा विषयः श्री एल डब्लु ठाकरे से.नि.सहाय्यक ग्रंथपाल, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या सेवानिवृत्ती वेतनाचा सुधारीत लाभाच्या फरकाची रक्कम मंजुर झाल्याबाबत

१) पत्र क्रं ससं/उशि/से.नि./२०१७/३००६ दिनांक ०२.०८.२०१७ या पत्रासोबत जोडलेले सहपत्र मुळसेवापुस्तक व सुधारीत सेवानिवृत्ती (वेतनाची फरकाची रक्कम) प्रस्ताव महालेखाकार कार्यालयाकडे आपले कार्यालयात पाठविला होता. त्यावर कार्यवाही होऊन आपल्या कार्यालयास मुळ सेवापुस्तक व प्रस्तावावरील कार्यवाहीचे पत्र आपल्या कार्यालयास प्राप्त झाले. तरी त्या कार्यवाहीची साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत मला मिळण्यात यावी
२) पत्र क्रं. २०२४ दि ७.८.२०१७ या पत्राची आपल्या कार्यालयाच्या जावक रजिस्टरमध्ये झालेल्या नोंदीची साक्षाकिंत केलेली झेरॉक्स प्रत मिळणे
३) दि ७.८.२०१७ द्वारे महालेखाकार कार्यालय नागपुर २ यांना पाठविण्यासाठी करण्यात आलेल्या प्रस्ताव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे ज्या पत्रान्वये प्रस्ताव करण्यात आला, महाविद्यालयाच्या त्या पत्राची साक्षाकिंत केलेली झेरॉक्स प्रत मिळणेबाबत
४) महाविद्यालयाचे पत्र क्रं ६११/पी/इ २०१८ दि.२७.१.२०१८ या पत्रावर आपले कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची साक्षाकिंत प्रत मिळणे आणि कार्यवाही करण्यात आली नसेल तर कार्यवाही न करण्यात आल्याबाबतची सविस्तर माहिती मिळणे
५) माझ्या दि २६.२.२०१८ च्या अर्जावर आपल्या कार्यालयाकडून झालेल्या कार्यवाहीची सांक्षाकित केलेली झेरॉक्स प्रत मिळणेबाबत

(काळावधी:दि.०२.०८.२०१७ ते आजपर्यंत (अर्जाच्या तारखेपर्यंत); नोंदणीकृत टपालाद्वारे)